## प्रेस नोट

अॅन्टी करप्शन ब्युरो,जळगांव
दि.२२.११.२०२२

आलोसे विवेक सोनु झरेकर, वय ५४, व्यवसाय नोकरी,निरीक्षक वैध मापनशास्त्र विभाग, पाचोरा ता. पाचोरा जि. जळगांव ह.मु.पुणगांव रोड, गजानन महाराज मंदिराच्या पाठिमागे पाचोरा मुळ रा.साकोरी, नगर मनमाड रोड,ता. राहता जि.अहमदनगर (खाते वैद्य मापन शास्त्र विभाग–वर्ग २) यांना ६,०००/–रुपये लाचेची मागणी करुन सदर लाचेची रक्कम पंचासमक्ष स्वत: स्वीकारंताना ला.प्र.विभाग,जळगांव यांची कारवाई.

| | | | |
|---|---|---|---|
| १ | घटक | :– | जळगांव. |
| २ | गुन्हा नोंद कंमाक | :– | पहुर पो.स्टे.गु.र.नं.३९९/२०२२ |
| ३ | कलम | :– | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम–७ प्रमाणे. |
| ४ | आरोपीचे नांव व कार्यालय | :– | **श्री.विवेक सोनु झरेकर, वय ५४, व्यवसाय नोकरी, निरीक्षक वैध मापनशास्त्र विभाग, पाचोरा ता. पाचोरा जि.जळगांव ह.मु. पुणगांव रोड, गजानन महाराज मंदिराच्या पाठिमागे पाचोरा मुळ रा.साकोरी, नगर मनमाड रोड, ता.राहता जि. अहमदनगर**<br>**(खाते वैद्य मापन शास्त्र विभाग – वर्ग २)** |
| ५ | मागणी केलेली लाचेची तारीख व रक्कम | :– | दि.२२/११/२०२२<br>६,०००/–रुपये लाचेची मागणी. |
| ६ | स्विकारलेली लाचेची रक्कम | :– | ६,०००/–रुपये. |
| ७ | गुन्हा दाखल तारीख | :– | दि.२२/११/२०२२ |
| ८ | थोडक्यात माहीती | :– | यातील तक्रारदार यांचा औरंगाबाद रोडवर जय बालाजी नावाने पेट्रोल पंप आहे. सदर पेट्रोल पंपावरिल ०४ नोझल मशिंनीची स्टॅम्पींगची मुदत दि.०८.१०.२०२२ रोजी संपलेली होती. त्याअनुषंगाने तक्रारदार यांच्या वतीने त्यांचा भाउ नरेंद्र वसंत बडगुजर यांनी दि.१२.१०.२०२२ रोजी वैधमापन शास्त्रविभाग,पाचोरा कार्यालयात ऑनलाईन अर्ज सादर करून, स्टॅपींगचे कामासाठी लागणा–या ३०,५००/–रु. शासकिय रकमेचा चलनाद्वारे ऑनलाईन भरणा केला होता.<br>त्यानंतर तक्रारदार यांनी दि.०४.११.२०२२ रोजी पाचोरा विभागातील वैधमापन कार्यालयात जावुन श्री.झरेकर, निरीक्षक यांची भेट घेउन त्यांना त्यांचे पेट्रोल पंपावरील गिल्बर्को कंपनीचे ०२ व टोकेम कंपनीचे ०२ असे एकुण ०४ नोझल मशीनची स्टॅम्पींग कोणत्या दिवशी करणार या बाबत विचारणा केली असता, तेव्हा त्यांनी तक्रारदार यांना सांगितले की, तुमच्या पेट्रोंल पंपावर असलेल्या नोझल मशिनची स्टॅम्पींग करून देण्यासाठी मी दि.२२.११.२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजेच्या सुमारास येणार आहे. तेव्हा तुम्हाला मला शासकिय फि व्यतिरिक्त ०१ नोझल मशिनचे १५००/–रु. या प्रमाणे ०४ नोझल मशिनचे एकुण ६,०००/–रु. द्यावे लागतील, असे सांगितले. तेव्हा श्री.झरेकर, निरीक्षक,यांनी तक्रारदार यांचे पेट्रोल पंपावरील एकुण ०४ नोझल मशिनची स्टॅम्पींग करुन तपासणीचे प्रमाणपत्र देण्याचे मोबदल्यात तक्रारदार यांचेकडेस शासकिय फि ३०,५००/–रुपये व्यतिरिक्त ६,०००/–रु.लाचेची मागणी केली त्या बाबत तक्रारदार यांनी दि.२२.११.२०२२ रोजी अॅन्टी करपशन ब्युरो, जळगाव कार्यालयाकडेस तक्रार दिली.<br>सदर तक्रारीची अॅन्टी करप्शन ब्युरो,जळगांव पथकाने दि.२२.११.२०२२ रोजी पंचासमक्ष पडताळणी केली असता यातील नमुद आलोसे विवेक सोनु झरेकर, निरीक्षक वैध मापनशास्त्र विभाग, पाचोरा ता. पाचोरा जि.जळगांव यांनी फिर्यादी यांचे पेट्रोल पंपावरील स्टॅम्पींगचे काम करुन देण्याच्या मोबदल्यात त्यांचेकडेस पंचासमक्ष ६,०००/– रुपये लाच रकमेची मागणी करून सदर लाच रक्कम आलोसे यांनी वर नमुद तारीख, वेळी व ठिकाणी स्वत: स्विकारली. म्हणुन गुन्हा. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबधी काही माहीती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकांबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग जळगांव कार्यालयात संपर्क करावा.

संपर्क पत्ता:– अॅन्टी करप्शन ब्युरो कार्यालय,जळगांव जिल्हाधिकारी कार्यालय परिसर,अल्पबचत भवन बिल्डींग,जळगांव.
ईमेल आयडी:– dyspacbjalgaon@gmail.com
संकेतस्थळ:– acbmaharastra.gov.in
टोल फ्री कंमाक:– 1064,दुरध्वनी कंमाक:–0257-2235477
व्हॉटसअॅप कंमाक:– 8766412529

23.11.2022

पोलीस उप अधिक्षक
अॅन्टी करप्शन ब्युरो,जळगांव

शशिकांत श्रीराम पाटील
पोलीस उप अधिक्षक
अॅन्टी करप्शन ब्युरो,जळगांव